# BMM and MAIYTRA News

June, 2010


## अध्यक्षीय

नमस्कार!

मंगलम् भगवान विष्णु, मंगलम् गरुडध्वजा,
मंगलम् पुण्डरीकाक्षु, मंगलाय तनु हरी ॥

श्री वेन्कटेश्वराच्या मंगलमय सानिध्यात वसलेल्या निसर्गरम्य पिट्सबर्ग या शहराला मी १५ मे रोजी भेट दिली. पिट्सबर्ग महाराष्ट्र मंडळाने " रंग संगीत" हा कार्यक्रम अतिशय सुंदर बसवला होता. मंडळाचे अध्यक्ष श्री. प्रियदर्शन मनोहर यांनी लिहिलेले "संसार वर्जन २" हे नाटककर्त्यांच्या लेखन कौशल्याची साक्ष देणारे होते. त्याच बरोबर मुलांनी बसवलेली निरनिराळ्या देशांच्या संस्कृतीमधली नृत्ये मनोवेधक होती. सर्वात महत्वाचे म्हणजे नृत्याच्या कार्यक्रमाची सर्व जबाबदारी मुलांनी स्वीकारली होती. माझ्या मते ही अतिशय उत्साहवर्धक गोष्ट आहे. मुलांना आई वडील मराठी संस्कृतीचे खत पाणी घालून त्यांची जोपासना करतात. असे कार्यक्रम पाहिल्यावर असे वाटते की आई वडिलांनी केलेल्या कष्टांचे चीज होत आहे. या कार्यक्रमाबद्दलचा लेख या वृत्ताच्या अंकात दिला आहे. मंडळातील सर्व सभासदांनी दाखवलेली आपुलकी व प्रेम पाहून बृ. महाराष्ट्र मंडळाविषयी त्यांना वाटणारी आस्था दिसून आली. पिट्सबर्गच्या भेटीत जगविख्यात विज्ञान मंदिरे (विद्यापीठे) म्हणजे कार्नेगी मेलन युनिवर्सिटी व युनिवर्सिटी ऑफ पिट्सबर्ग बघण्याचा योग आला.

पिट्सबर्गच्या अनुभवावरून मला असे म्हणायचे आहे की कुठल्याही मराठी मंडळात जेव्हा मुलामुलींना, तरुण तरुणींना प्रोत्साहन दिले जाते व सहभागी करून घेतले जाते तेव्हा त्या मंडळाचे भवितव्य उज्वल असते. जुलै २ ते जुलै ५ वॉशिंग्टन डी. सी. मध्ये "मैत्र" चे अधिवेशन आहे. त्याबद्दल अधिक माहिती या वृत्ताच्या अंकात दिली आहे. आपल्या माहितीतील सर्व तरुण तरुणींना ही माहिती वाचायला द्यावी व 'मैत्र' अधिवेशनाला तरूणवर्गाने उपस्थित राहण्यासाठी आपण त्यांना उत्तेजन द्यावे. 'मैत्र' अधिवेशनानंतर या मुलांनी संपर्कात राहावे यासाठी प्रयत्न चालू आहेत. बृहन्महाराष्ट्र मंडळाने तरुण मुलांचे networking चालू कसे राहील याबद्दल प्रयत्न सुरु केले आहेत. प्रत्येक मंडळाने तरुण मुलांच्या प्रतिनिधीचे नाव पाठवावे. अशा मुलांचा "Youth Interaction Group" करायचे ठरवले आहे.

कळावे लोभ असावा.


**सौ. माधुरी जोशी**

*msjoshi17@yahoo.com*


## विलिस टॉवर वरून ...

नमस्कार मंडळी,

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या शिकागो येथील आगामी संमेलनाची तयारी जोरदार चालू झाली आहे. बृ. म. मंडळाच्या कार्यकारणीच्या संमतीने अधिवेशनाच्या उद्घाटन सोहोळ्याची (ओपनिंग सेरेमनीची) जबाबदारी शिकागो मंडळाने उचलली आहे. हा मनोरंजनात्मक कार्यक्रम शिकागोपुरता मर्यादित न ठेवता सर्व उत्तर अमेरिकेतील मंडळांना सामावून घ्यायचा आमचा मानस आहे. मिड्-वेस्ट मधील मराठी मंडळांकडून तर आम्हाला थेट सहभाग हवा आहे!

मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीतील ताकदीच्या अभिनेत्री अनुपमा धारकर ह्या शिकागोच्या जुन्या रहिवासी. अधिवेशनाच्या उद्घाटन समारंभाच्या कार्यक्रमाच्या निर्मितीची जबाबदारी त्यांनी उचलली आहे. नृत्य-नाटिकेच्या निर्मितीचा दांडगा अनुभव असलेल्या अनुपमा धारकर यांच्या तालमीत सादर होणारा हा समारंभ आगळा-वेगळा, दर्जेदार, आणि देखणा होणार यात शंकाच नाही. उत्तर अमेरिकेतील गायक, वादक, नृत्यदिग्दर्शक, नर्तक, लेखक, कवी सर्वासर्वांना विनंती की तुम्हाला या सोहळ्यात सहभागी व्हायचं असल्यास अनुपमा धारकर, ईमेल - anupama.dharkar@bmm2011chicago.com वर संपर्क करावा. कार्यक्रमाचा वरचा दर्जा राखण्यासाठी, सहभागी होउ इच्छिणा-या सर्वांसाठी काही किमान नियमही केले आहेत. अधिक माहिती http://bmm2011chicago.org/ ह्या संकेतस्थळावर दिल्या जाईल. तुमच्या मंडळाच्या स्थापनेचा इतिहास (कधी, कुठे, कुणी इ.) आणि त्याच्याशी निगडीत असणारी छायचित्रं आम्हाला हवी आहेत. ही सर्व माहिती कृपया कल्पना निमकर यांच्याकडे kalpana.nimkar@bmm2011chicago.com ह्या ईमेलवर पाठवावी. बृहन्महाराष्ट्र मंडळाशी संलग्नित प्रत्येक मंडळ अधिवेशनाच्या उद्घाटन कार्यक्रमात दिसणार बरं का! मग भाग घेणार ना या सोहोळ्यात?


**माहिती आणि प्रसारण समिती**

बृ. म. मंडळ अधिवेशन (२०११), शिकागो



# Come to MAIYTRA!

***July 2-5, 2010 in Washington, DC***

## maiytra for ALL!

Welcoming ALL young adults 18-35+, including undergrads and couples, Marathi or otherwise.

If you're...

- ✓ Single & Loving it
- ✓ On the Lookout
- ✓ Ready to Go Steady
- ✓ Coupled Up
- ✓ Interested in Professional Networking

## *MAIYTRA 2010 will have it all!*

- ✓18+ welcome to ALL events, including nightlife!
- ✓Free T-Shirt & Hospitality Bag!
- ✓Discounted rooms at the Capital Hilton!

*Facebook getting stale?*
*LinkedIn too boring to look at?*
*Shaadi.com got you down again?*

You'll love MAIYTRA CONNECT
YOUR *exclusive* online social and professional network!

***Low Registration Price of $230 extended through May 31***

**Register NOW**

**Invite your friends!**

***Guarantee your place at the convention you don't want to miss!***

**www.maiytradc.com**

## New for 2010!

- **The Spy Hunt:** Use all your skills as a secret agent to explore DC and uncover its covert history!
- **MAIYTRA Kick-Off Party & Club Night:** Experience DC After Hours!
- **Casino Royale:** Black tie optional banquet, dance, and casino night!
- **Discover DC:** a foodie adventure, scenic jogs, and guided tours of America's capital during Independence Day!
- **Pub Trivia:** Test your knowledge of American & Marathi culture & history!
- **INTERESTing Conversations:** Find new friends that share your interests, whether books, movies, politics, sports, or much more!
- **Heritage Festival:** Festivals, traditions, dance, music, cuisine, art, history, and much more. Immerse yourself in the best Marathi culture has to offer!
- **"Aanandi Aanand Gade":** A play in Marathi & English. Love, identity, and the often-hilarious challenges of relating to our parents' generation!
- **Seminars & Discussions on:**
  - *Living Hindu in the 21st Century*
  - *Krishna, Hercules & Harry Potter*
  - *Dating While Desi*
  - *Long-Term Expectations in Relationships*
- **Professional Networking & Mentorship Program:** Plus an entrepreneurship seminar and Traditional & Alternate Career Panels!
- **Service Project:** – Give back at MAIYTRA, and find others who feel the same!

**HAPPY Father's Day** (May 20, 2010) - to all Fathers who bring their children up to become a- Noble Person.

युरोपीय मराठी संमेलन २३- २५ जुलै ,२०१०, स्वित्झर्लंड
http://ems2010.org/

# Is Marathi Culture at Risk?

Having spent the last 10 months organizing BMM MAIYTRA ( Bruhan Maharashtra Mandal's Maharashtrian Association of Indian Youth Together Representing America)-young adults' convention, we have been working to build a comprehensive profile of the Marathi young adult community, and collecting statistics to better understand our attendees, their backgrounds, interests, and needs. I can now answer this question more definitely, and the answer is that yes, Marathi culture *is* at risk.

If Marathi culture in North America is to survive and thrive in future decades, then the responsibility comes upon the current generation of Marathi-Americans to pass it forward. The question then becomes, is our generation capable and willing to do so?

As a second-generation Marathi-American, it's easy to understand why many others of my generation have found it easier to assimilate fully into American culture rather than put in the effort to retain their ancestral culture. Even for those that do still care about preserving their heritage, it's much simpler to let our identities be subsumed into a greater Indian-American identity. There are far more people with whom we can share that bond, and it's much more readily understood by our American friends and neighbors.

Fully 33% of our attendees are not conversational or fluent in the Marathi language. Experience has shown that language is critically important to national and cultural identity. Even the 67% with Marathi proficiency do not have the opportunity or cause to utilize it outside of immediate family interactions. Given the busy pace of life in the 21st century and the strain of balancing careers with family, how many young parents will have the time and energy to teach their children Marathi as well as English? Without an organized community effort to preserve it, the Marathi language is likely to fade from usage in North America within a generation, especially as fresh immigration from Maharashtra continues to slow down.

One of the most diverse and wondrous legacies India has given human civilization is its multiplicity of religious and spiritual traditions. Yet less than 31% of our attendees consider themselves to be religious. Maharashtra, in particular, is home to some of the richest and most progressive and interesting religious traditions in India, in Hinduism and Islam, and even Zoroastrianism and Judaism. Every child of this rich heritage has the right and responsibility to choose for themselves if and how they will integrate religion and spirituality into their life, but with so few Marathi young adults who consider themselves to be religious, will their children even have the chance to learn about their spiritual heritage?

If these statistics seem grim, consider that they're drawn from the population of Marathi young adults that still care enough about their heritage to attend MAIYTRA. Imagine how much worse it must be if you were to include all the Marathi-Americans who've already distanced themselves from our community and heritage.

Most parents assume that their kids will be different, that they were 'raised right' and will keep our culture, and that they'll be the exception. The truth is, that even for those of us who *do* value and embrace our culture and wish to pass it on, most of us have only a limited ability as individuals to do so, as a result of gaps in our own knowledge and how busy and stressful balancing our lives can be. Many of my generation can cook a few Marathi dishes, but how many can cover the full range of cuisine that our mothers can? Most of us grew up learning to play instruments or dance or sing, but how many of us have continued as adults? And given the other Western artistic choices for our children (ballet, orchestra, band, etc.) how likely is it that our children will be exposed to their artistic heritage? Most of us know Shivaji was a great Maratha leader, but how many understand why his achievements were so remarkable? And how many could effectively teach their kids about Marathi history?

To have any hope of success, raising the next generation of Marathi-Americans *must* be a community effort. While many of us do rely (or will) on our parents and extended family, even that has its limits. What's needed is a true community of our peers, who understand what it was like to grow up and come of age as both Marathi and Americans. Peers that share our values and worldview and appreciation for the balance of cultures we hope to pass on to our children.

So if we accept that Marathi culture *is* at risk, and that it can only be saved through a *community* effort, the question then turns to how this community might emerge. The Mandals and BMM conventions alone will not suffice, since, unfortunately, most Marathi-Americans don't attend or participate in Mandal events once they move out of their hometown or graduate college.

A critical goal of BMM is to use MAIYTRA 2010 and future conventions to build the mutually supportive and sustaining community that will help carry our culture forward into future generations. Additionally, we're working hard to encourage our attendees to connect with the Mandals and participate and volunteer more actively in their local community. It's also the main reason that we've expanded MAIYTRA to include the full breadth of the young adult community this year. Instead of just 20-something singles, we want to welcome undergraduates who can benefit from the career guidance and personal support we can give them as they navigate their early 20s. We want to welcome young couples, even ones who've already started their families, and help them support each other and share their challenges and experiences with other young adults. We believe that greater diversity and collective experience will make us a stronger community for the future, and will in turn benefit the greater Marathi community across North America. Despite misconceptions you may have heard, MAIYTRA isn't a weekend-long party or a 'dating convention'. We have fun social activities planned, and we do have resources for those that are looking to meet someone, but we have a lot more to offer everyone as well. 67% of our attendees are excited about the professional networking opportunities at MAIYTRA 2010. 75% are interested in cultural programs, and 40% are interested in religion seminars. 37% are interested in participating in a community service project. MAIYTRA is an energetic

community that actively wishes to celebrate Marathi culture, strengthen our community with professional connections, and give back through the social service- that's such a strong part of our Marathi heritage. If you believe in preserving our culture as strongly as we do, please pass the word onto any young adults (ages 18-35+) who might be interested in being a part of this community that there's still time (until June 15) to register for MAIYTRA 2010 at http://www.maiytradc.com. The convention will be held July 2-5 in Washington, DC and we've planned a much more diverse program to fit the needs of all ages, life stages, and social styles of our attendees.

Please also consider supporting MAIYTRA 2010 with a tax-deductible donation. Any amount will help a great deal (http://donate.maiytradc.com)

Speaking for myself, I already know that the friends I've made through MAIYTRA and BMM will someday be kakas and aatyas to my children. While there's a great deal of our culture that I look forward to teaching them someday, I know that I can't teach them everything. Nor can I, in every situation, be the role model or source of advice they'll need as they struggle to balance their cultures. But thanks to the friends I'm making and what we're together building for the future, I know that I won't be raising them alone, and that their 'family' will extend across the continent. My children will be luckier because of it, and that's something MAIYTRA gave me.

**Vijay Paradkar**, *is serving as the President of the MAIYTRA 2010 Convention. Further inquiries can be directed to president@maiytra.com .*

***

## Dr. Jay Shendure - Research Scientist- - Recipient of 2010 Young Investigator Award



Dr. Jay Shendure is an Assistant Professor in the Department of Genome Sciences at the University of Washington. The Prostate Cancer Foundation announced on April 13, 2010 that Dr. Jay Shendure, is one of the 21 research scientists in the United States and Canada to receive a 2010 Young Investigator Award. The award provides innovative scientists with three years of funding to pursue transformational research questions that may help men affected by prostate cancer.

Shendure, 35, received The Lowell Milken Prostate Cancer Foundation Young Investigator Award, named for the chair and co-founder of The Milken Family Foundation, a private philanthropy for education and medical research.

Shendure and his research group are working to eliminate technological obstacles to understanding the genetic events that cause the start and spread of prostate cancer. The Shendure lab has developed new bio-technology to efficiently identify disease-relevant variations in human genomes.

Shendure is a 1996 graduate of Princeton University. He earned a Ph.D. degree in genetics in 2005 from Harvard University and an M.D. degree from Harvard Medical School in 2007. That same year he joined the faculty at the UW School of Medicine in the Department of Genome Sciences. As an M.D. /Ph.D. student in the Harvard lab of Dr. George Church, Shendure, along with his several mentors and fellow students, made major technological breakthroughs in DNA sequencing. In 2006 while a student at Harvard Medical School, Jay received a prestigious TR35 award from MIT. Bio-technologist and medical student Jay Shendure is revolutionizing genetics with a new way to sequence DNA. In 2005, he used off-the-shelf parts to determine the order of all the DNA bases in a bacterial genome, at 20 times the speed and one-ninth the cost of traditional DNA equencing.

Shendure is now working to make the process even more efficient; by 2015, he says, it may enable biologists to sequence a person's genome for just $1,000.

Jay lives in Seattle with his wife Dr. Alexandra Molnar and two children. He is the son of Ashok & Rajanee Shendure who live in Chagrin Falls, Ohio.

## RASPBERRY MAGIC

**Leena Pendharkar-** written film- RASPBERRY MAGIC -is screened at the **Los Angeles** Asian Pacific Film Festival on Saturday, May 1, 2010 at the Directors Guild of America. The film story of the Shah family is unfortunately, far from unusual- the father has lost his job, the mother struggles to fill in as the primary bread winner, and their two school-aged daughters are caught squarely in the middle. "This isn't a movie about abuse or something totally crazy, but just the daily struggles that people go through" says Leena.

# मराठी मंडळातून फेरफटका

## पिट्सबर्ग महाराष्ट्र मंडळाचा लोकप्रिय कार्यक्रम रंगसंगीत

दि १५ मे रोजी श्री वेंकटेश्वर मंदिराच्या सभागृहात पिट्सबर्ग महाराष्ट्र मंडळाने त्यांचा अत्यंत लोकप्रिय कार्यक्रम रंगसंगीत सादर केला. समारंभाला प्रमुख पाहुण्या म्हणून बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अध्यक्षा सौ. माधुरी जोशी लाभल्या होत्या.

सलग पाचव्या वर्षी साज-या झालेल्या या कार्यकमात प्रथम डॉ. प्रियदर्शन मनोहर लिखित संसार...व्हर्जन टू ही धमाल विनोदी संगीत एकांकिका सादर केल्या गेली. बायको, आई आणि नोकरी/व्यवसाय करून पैसे कमावणारी स्त्री ह्या भूमिका यशस्वीपणे सांभाळणं म्हणजे तारेवरची कसरतच. जगाच्या पाठीवर तुम्ही कुठेही रहात असा– रोजरोजची, न संपणारी ही कसरत करून थकल्या–भागलेल्या जीवांना असं वाटणारच-

देवा! कृपा कर! मला माझं आयुष्य सुधारून दे! मला माझ्या संसाराची व्हर्जन टू दे!' आणि खरंच! देव तुमच्या मदतीला धावला तर? ह्या मध्यवर्ती कल्पनेवर आधारित ही एकांकिका पिट्सबर्गच्या कलाकारांनी सफाईदारपणे सादर केली. डॉ. रत्नाकर मुजुमदार यांचं नेपथ्य, संदीप सबनीस, सौ. अनघा मनोहर ह्यांचं समर्थ दिग्दर्शन तर हर्षल व डॉ. अमिता मुल्हेरकर यांचं पार्श्वसंगीत यांच्यामुळे एकांकिकेत विशेष रंग भरला.

मध्यंतरानंतर 'Global Cultures Through Dances' हा तरुण मुलामुलींनी बसवलेला नृत्यांचा अनोखा कार्यक्रम कल्पनेपेक्षाही जास्त लोकप्रिय झाला. मुलांचा मराठी मंडळाच्या कार्यक्रमात उत्साही सहभाग असावा ह्या हेतूने मंडळाच्या कार्यकारी समितीने एका अभिनव उपक्रमाची आखणी केली. वय वर्षे १३ ते १८ ह्या वयोगटाच्या मुलामुलींना असं आवाहन केलं की त्यांनी एक तासाच्या एका उत्कृष्ट कार्यक्रमाची निर्मिती करावी. जगभरच्या वेगवेगळ्या संस्कृतींचं दर्शन त्यांनी नृत्यांच्या माध्यमातून लोकांना घडवावं. आणि चमत्कार व्हावा तसं हे आव्हान २२ युवकयुवतींनी स्वीकारलं. भरतनाट्यम् शैलीतल्या गणेश स्तवनानं सुरुवात करून कोरीयन समशेर नृत्य, आफ्रिकन सफारी, क्यूबन साल्सा, आयरिश, अरेबिक,



अमेरिकन हिप-हॉप, पंजाबी भांगडा आणि शेवटी 'One World' अशी नऊ नृत्यं सादर करून जगभरच्या संस्कृतींची ओळख आणि वैविध्य प्रेक्षकांसमोर उभं केलं. प्रेक्षकांनी अनाहूतपणे पायांचा ठेका धरला आणि टाळ्यांच्या गजरात 'Once more' ची मागणी केली आणि कलाकारांनी ती पूर्ण सुद्धा केली! संस्कृतींचा आणि नृत्यशैलींचा अभ्यास, कार्यक्रमाची बांधणी, सादरीकरण, सूत्रसंचलन इत्यादी सर्व बाबी मुलांनी समर्थपणे सांभाळल्या.

पिट्सबर्ग मंडळाच्या उपाध्यक्षा सौ. संगीता बोकील व कार्यकारिणी, मंडळाचे इतर सभासद, मुलांचे आई-बाबा/आजी-आजोबा या सर्वांनी मुलांना हवी ती मदत उपलब्ध करून दिली. परंतु कार्यक्रमाच्या आणि नृत्यांच्या निर्मिती प्रक्रीयेत ढवळाढवळ न करता मुलांना त्यांचे निर्णय घ्यायचं संपूर्ण स्वातंत्र्य दिलं गेलं. आणि ह्या स्वातंत्र्याचं मुलांनी चीज केलं ही खरोखरच आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट आहे! तरूण मराठी अमेरिकन पिढीच्या यशस्वितेची खात्री बाळगत पिट्सबर्गचे रहिवासी घरोघरी परतले ते पुन्हा अशा त-हेचा कार्यक्रम केलाच पाहिजे अशी मनाशी खूणगाठ बांधूनच !

**डॉ. प्रियदर्शन मनोहर (पिट्सबर्ग)**

***

## 'पोपटपंची' – निखळ चावट 'मॉडर्न' तमाशा

कॅलिफोर्निया आर्टस् असोसिएशन (कला) या संस्थेने ४ एप्रिल २०१० रोजी सॅन फ्रान्सिस्को बे एरीयामध्ये शफाअत खान लिखित पोपटपंची या नवीन नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग केला. महाराष्ट्रात शफाअत खान यांनी या नाटकाचे अनेक वेळा वाचन केले आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे या नाटकाचा जगातला पहिला प्रयोग करण्याची संधी महाराष्ट्रातील व्यावसायिक संस्थेला नव्हे तर कला ह्या अमेरिकेतील हौशी रंगकर्मींच्या संस्थेला मिळाली.

पोपटपंची नाटकाची मांडणी १२व्या शतकात संस्कृतमध्ये लिहीलेल्या शुकसप्तती या ग्रंथावर आधारलेली आहे. शुकसप्तती ग्रंथात एक व्यापारी दूरच्या प्रवासाला निघण्यापूर्वी आपल्या पत्नीच्या पाळीव पोपटाला दररोज रात्री पत्नीला एक नवीन गोष्ट सांगण्याचे काम सोपवतो. हेतू हा की पत्नी गोष्टीत गुंतून जावी आणि तिने आपल्या प्रियकराला भेटायला जाऊ नये. पोपट ७० रात्री ७० नवीन गोष्टी सांगतो. गोष्टीत गुंगून पत्नी घराबाहेर पडत नाही.

शफाअत खान यांच्या पोपटपंची मध्ये घाबरट डॉन, त्याची बिअर बार-बाला बायको मैना, डॉनने घडवलेला आश्रमातला बुवा, त्याचा बायकोला गोष्टी सांगण्यासाठी बनवलेला पोपट, गुंड मिर्ची, इमानदार हवालदार, त्याची सदा चाळवलेली बायको, गोंधळलेला पोलिस कमिशनर, कॉस्मेटीक सर्जरी करणारा डॉक्टर, आश्रमात इंग्लंडहून आलेली मुलगी असा सगळा स्फोटक मसाला आहे. बॉंबशोध पथकातील कुत्री गरोदर होते म्हणून हवालदाराला नोकरीवरुन काढून टाकण्यात येतं इथून गोष्टीला सुरुवात होते. मग हवालदारीची चौकशी, नार्को टेस्ट, कमिशनरची अचानक राधा होणं, मैना आणि पोपट बनून तिच्यावर लक्ष ठेवण्यासाठी राहिलेल्या बुवांचच प्रेम जुळणं, हवालदाराची बायको आणि डॉक्टर यांनी लग्न ठरवणं, आश्रमात बुवाची गादी सांभाळणाऱ्या मिर्चीने इंग्लंडहून आलेल्या मुलीशी सूत जमवणं अशी अनेक उलटसुलट वळणं घेताघेता पोपटाच्या गोष्टीतील पात्रं पोपट आणि मैनाच्या जगण्यातंच ढवळाढवळ करायला लागतात. गोष्टीतली गोष्ट अधिकाधिक गुंतागुंतीची होत जाते.

बे एरियाच्या स्टेजवरचं हे पहिलं R-Rated नाटक सादर करुन कला या संस्थेने वेगवेगळे प्रयोग करत राहण्याची आपली

परंपरा चालू ठेवली. प्रेक्षकांच्या प्रतिक्रीयांवरुन हा प्रयोग यशस्वी झाला असेच म्हणावे लागेल. कला चे ध्येय आहे - कलेमधून...कलेसाठी... कलारत रहायचं.

कला बद्दल अधिक माहिती: www.calaaonline.com

***

## पहिले विश्व मराठी नाट्य संमेलन



अखिल भारतीय नाट्यपरिषदेचे ९०वे आणि भारताबाहेरील पहिले विश्व मराठी नाट्य संमेलन २८ ते ३१ मे दरम्यान न्यू जर्सी येथे राहवे शहरातील युनिअन कौन्टी परफॉर्मिंग आर्टस् सेंटरच्या प्रेक्षागृहात सुमारे १३०० नाट्यप्रेमींच्या उपस्थितीत संपन्न झाले. संमेलन जाहीर झाल्यावर सुरवातीला उत्तर अमेरिकेतील मराठी नाट्य रसिकांकडून मिळालेला अपेक्षेपेक्षा कमी प्रतिसाद व त्यामुळे संमेलनस्थळात करावा लागलेला बदल, संमेलनाच्या अध्यक्षपदावरून महाराष्ट्रात झडलेले वादविवाद, भारतातून येणाऱ्या कलावंतांना व्हिसा मिळण्यास झालेला विलंब, अशा अनेक अडचणींना तोंड देऊन संमेलन यशस्वी होण्यामागे नाट्यपरिषदेच्या न्यू जर्सी शाखेच्या अध्यक्षा डॉ. मीना नेरुरकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे अथक परिश्रम कारणीभूत आहेत. या परिश्रमांच्या जोडीने महाराष्ट्र शासन व महाराष्ट्रातील आणि उत्तर अमेरिकेतील अनेक दानशूर व्यक्ती व संस्थांचे आर्थिक पाठबळही या संमेलनाला मिळाले.

संमेलनाचे औपचारिक उद्घाटन जरी २९ तारखेला झाले, तरी त्याच्या पूर्व-संध्येला म्हणजेच २८तारखेला अमेरिकेतील पारितोषिक विजेत्या मुक्तीधाम, निळाई आणि पसारा, व घर दोघांचे या तीन एकांकिकांद्वारे कार्यक्रमांना प्रारंभ झाला. दुस-या दिवशी सकाळी नाट्यसंमेलनांच्या नेहमीच्या प्रथेनुसार ढोल, लेझीम, ताशे यांच्या जल्लोषात शानदार दिंडी निघाली व पालखीतून श्री नटेश्वराचे रंगमंचावर आगमन झाले. सुरवातीला पारंपरिक नांदी झाल्यावर डॉ. मीना नेरुरकर लिखित व दिग्दर्शित जुळले नाते मनामनाचे ही दीर्घांकिका फिलाडेल्फियाच्या कलावंतांनी सादर केली. सव्वाशे वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील तत्कालीन समाजाचा विरोध पत्करून अमेरिकेत वैद्यकीय शिक्षणासाठी आलेल्या आनंदीबाई जोशींचा जीवनपट उलगडणारी ही कलाकृती प्रेक्षकांना अतिशय आवडली.

दीर्घांकिका संपल्यावर, आनंदीबाई जोशींचे अमेरिकेतील पालकत्व स्वीकारलेल्या कार्पेन्टर कुटुंबाच्या वारसदार श्रीमती नॅन्सी स्टोन यांना रंगमंचावर पाचारण करून डॉ. मीना नेरुरकरांनी त्यांची घेतलेली मुलाखत कमालीची रंगली.



यानंतरच्या उद्घाटन सोहळ्यासाठी भारताचे कृषी मंत्री श्री. शरद पवार, महाराष्ट्राचे ग्रामविकास मंत्री श्री. जयंत पाटील, संमेलनाध्यक्ष श्री. रामदास कामत, नाट्यपरिषदेचे अध्यक्ष मोहन जोशी, नाट्य परिषदेच्या कोषाध्यक्ष श्रीमती वंदना गुप्ते, अतिथी श्रीमती उर्मिला मातोंडकर, आयोजक डॉ. मीना नेरुरकर, प्रायोजक श्री दत्तात्रय म्हैसकर (IRB), बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती माधुरी जोशी, डॉ. जगदीश कुलकर्णी, श्रीमती गाडगीळ (PNG Jewelers) इत्यादी मान्यवर रंगमंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन श्री. अतुल परचुरे व श्रीमती मधुरा गोखले यांनी केले.

दुपारच्या सत्रात आनंद म्हसवेकर लिखित व दिग्दर्शित यु टर्न या गेले वर्षभर महाराष्ट्रात गाजत असलेल्या व अनेक पुरस्कार प्राप्त नाटकाचा अत्यंत बहारदार प्रयोग झाला. पन्नाशीतील घटस्फोटित निवृत्त मेजर आणि एक समवयीन विधवा गृहिणी यांच्यात जुळलेली मैत्री व त्यांचे सहजीवन- या आगळ्या वेगळया विषयावरील हे नाटक, अतिशय कसदार लेखन व श्रीमती इला भाटे आणि डॉ. गिरीश ओक यांचा अप्रतिम अभिनय यामुळे प्रदीर्घ काळ प्रेक्षकांच्या स्मरणात राहील.

संध्याकाळी भारतातून आलेल्या कलाकारांनी नाट्यसंगीत, नाट्यप्रवेश व विविध नृत्यांनी परिपूर्ण असा कलारजनीचा रंगतदार कार्यक्रम पेश केला. विशेष उल्लेखनीय भाग म्हणजे मुकुंद राज (तबला) आणि सोनाली परचुरे (कथ्थक) यांनी सादर केलेला एक आगळा वेगळा संवाद. त्यानंतर रात्री सादर झालेले बेसमेंट थिएटर शिकागो निर्मित बूमरँग हे नाटक, एकेकाळच्या मराठी, हिंदी, गुजराती चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री अनुपमा यांच्या प्रमुख भूमिकेमुळे वैशिष्ट्यपूर्ण ठरले.

रविवार ३० तारखेची सुरवात थिएटर अकॅडमी, पुणे निर्मित, सतीश आळेकर लिखित व दिग्दर्शित बेगम बर्वे या एके काळी

खूप चर्चा झालेल्या प्रायोगिक नाटकाने झाली. चंद्रकांत काळे यांच्या सकस गायन व अभिनयाने हे नाटक प्रेक्षकांच्या पसंतीस पडले. दुपारी शतकातील नाटक - मराठी नाटकाची ऐतिहासिक परंपरा हा बहारदार कार्यक्रम मराठी रंगभूमीवरील आघाडीचे दिग्दर्शक श्री. चंद्रकांत कुलकर्णी यांनी महाराष्ट्रातून आलेल्या



नामवंत कलाकारांच्या साथीने सादर केला.

जयंत सावरकर (एकच प्याला), रमेश भाटकर व डॉ. गिरीश ओक (अश्रूंची झाली फुले), विजय कदम, प्रदीप पटवर्धन, संतोष पवार (विच्छा माझी पुरी करा), भारती आचरेकर व मंगेश कदम (नांदा सौख्यभरे), वंदना गुप्ते व सुनिल बर्वे (संध्याछाया), मुक्ता बर्वे, दीपक करंजीकर, चंद्रकांत कुलकर्णी (ती फुलराणी), मोहन जोशी व सविता मालपेकर (गाढवांचं लग्न), सुकन्या कुलकर्णी व अभिजित चव्हाण (कमला), नीना कुलकर्णी व सुशांत शेलार (ध्यानी मनी), प्रशांत दामले (लग्नाची गोष्ट) अशा अनेक दिग्गजांनी घडविलेला हा नाट्य प्रवास प्रेक्षकांना एका वेगळ्याच विश्वात घेऊन गेला.

यानंतर समारोपाच्या समारंभात डॉ. मीना नेरुरकर यांच्या प्रास्ताविकानंतर पारितोषिक वितरण, मान्यवरांचे सत्कार व काही पुस्तकांचे प्रकाशन झाले. बृ. म. मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती माधुरी जोशी यांनी जुलै २०१० मध्ये वॉशिंग्टन डीसी येथे होणाऱ्या मैत्र अधिवेशनाचे व शिकागो येथे २०११ मध्ये भरणाऱ्या बृ. म. मंडळाच्या अधिवेशनासाठी उपस्थितांना आवाहन केले. प्रमुख पाहुणे आमदार नितीन सरदेसाई व संमेलनाध्यक्ष श्री. रामदास कामत यांच्या भाषणांनंतर वंदना गुप्ते यांनी आभार प्रदर्शन केले.

रात्रीच्या भोजनानंतर पुरुषोत्तम दारव्हेकरांच्या कट्यार काळजात घुसली या सदाबहार संगीत नाटकाचा प्रयोग भरत नाट्य संशोधन मंदिर, पुणे यांनी केला. पं. वसंतराव देशपांडे यांनी अजरामर केलेली खांसाहेबांची भूमिका चारुदत्त आफळे यांनी तितक्याच तोलामोलाने पेलली. या प्रयोगाचे वैशिष्ट्य म्हणजे सदाशिवची प्रमुख भूमिका करणारा कलावंत व्हिसाच्या अडचणीमुळे येऊ न शकल्याने त्याच नाटकात दुय्यम भूमिका करणारा हृषिकेश बडवे याने ही भूमिका फक्त दोन दिवसांत सराव करून ताकदीने उभी केली. एकापेक्षा एक सरस गाण्यांनी रंगलेल्या ह्या नाटकाला रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली.

नाट्यसंमेलनाच्या अखेरच्या दिवशी सकाळी भारतातील पारितोषिक विजेत्या तीन एकांकिका सादर झाल्या. त्यातील दृष्टी ही एकांकिका, लेखक योगेश सोमण यांनी निवडलेल्या विषयाच्या नाविन्यामुळे व कलाकारांच्या दर्जेदार अभिनयामुळे प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस आली. या दिवसाचे एक वैशिष्ट्य म्हणजे लोकांच्या आग्रहाखातर संमेलनाध्यक्ष श्री. रामदास कामत यांनी सादर केलेली दोन नाट्यगीते. सत्तरीतील या कलावंताने आपली पूर्वी गाजलेली गुंतता हृदय हे व श्रीरंगा कमलाकांता ही पदे विलक्षण जोमाने पेश केली.

यानंतर न्यू जर्सीच्या श्री. हेमंत कुलकर्णी यांच्या संगीत विद्यालयातील बाल विद्यार्थ्यांचे नाट्य व सुगम संगीत आणि न्यू यॉर्कच्या श्रीमती मानसी करंदीकर यांच्या नृत्यवृंदातील तरुण कलाकारांची लावणी नृत्ये यांनी अमेरिकेतील पुढची पिढी महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा यशस्वीपणे जोपासत असल्याची ग्वाही देत संमेलनाची सांगता झाली.

**संजय गोखले** (फ्लशिंग, न्यू यॉर्क )

**Note:** This BMM News bulletin is extracted from BMM's monthly Publication, June 2010, Bruhan Maharashtra Vrutta.

-**Vinata Kulkarni** (Editor, BMM Vrutta)

बृहन्महाराष्ट्र वृत्त

**BMM's Monthly Publication since 1981**
**Subscription Remittance Address**
BMM Newsletter
144 Hope Road, Holland, PA 18966-5408
Tel: 1-215-354-1423 (EST), E-mail: brihanmm@gmail.com

**Subscription Rates**

| Paper Copy | US | Canada | Other |
|---|---|---|---|
| वार्षिक : | $ 21 | $ 26 | $ 41 |
| द्वैवार्षिक : | $ 40 | $ 50 | $ 80 |
| आजीव: | $250 | $350 | $375 |

**Electronic copy: $10 /year $120 Life membership**

जाहिरातींचे दर

पूर्ण पान: : $160 अर्धे पान: $ 90
पाव पान : $ 55 अष्टमांस पान: $ 40

http://www.bmmonline.org/newsletter.htm